SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY, AMRAVATI'S

# SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE, MOTALA

**(NAAC Re-accredited with C Grade with CGPA 1.86)**

ISO 9001: 2015 Certified College






3rd Cycle
Assessment & Accreditation by NAAC

## CRITERION – VII

### INSTITUTIONAL VALUES AND BEST PRACTICES

QlM – 7.1.3

Report on Environmental Promotional activities conducted beyond the campus with geo tagged photographs with caption and date

# INDEX


| Sr. No. | Content | Page No. |
|---|---|---|
| 1 | Declaration | 1 |
| 2 | Palas Tree Conservation (*Butea monosperma*) Campaign | 2 |
| 3 | Tree Plantation Program at Kharbadi | 7 |
| 4 | Tree Plantation Drive at Didola Bk | 8 |
| 5 | Tree Plantation For Miyawaki Forest At Sindkhed (Praja) and Jaypur | 11 |
| 7 | Appreciation Letter from Paani Foundation | 17 |
| 8 | Tree Plantation and Seedball Preparation | 18 |
| 9 | Tree Plantation at Sangalad | 19 |
| 10 | Cleaning of the River at Sangalad | 20 |

Shri Shivaji Education Society Amravati's
SHRI SHIVAJI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE,
MOTALA, DIST. BULDHANA (M.S.)
(NAAC Re-accredited with C Grade with CGPA 1.86)
College Code : 317 E-mail : ssacscm317@gmail.com Website : www.sscmotala.ac.in Cell No. : 9422945519

Shri. Harshvardhan P. Deshmukh
President
Shri. Shivaji Education Society, Amravati

Dr. Gajanan N. Jadhao
M.A., Ph.D., B.Ed.
Principal



Outward No. SSACSCM/................................ Date: 20/05/2023

# Declaration

This is to certify that the information, reports, true copies of the supporting documents, numerical data, etc. furnished in this file have been verified by the IQAC and the Head of the Institution. The data is found correct.

Hence the certificate.

IQAC CO-ORDINATOR
Shri Shivaji Arts,Commerce
and Science College,Motala

Shri Shivaji Arts,Comm.& Science College * Motala *

Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College Motala,
Distt.Buldana

## Report on Environmental Promotional activities conducted beyond the campus with geotagged photographs with captions and dates.

### 1) Palas Tree Conservation (*Butea monosperma*) Campaign:

Department of Botany in collaboration with the nature club conducted a campaign against the cutting of palas trees on the occasion of the "Pola" festival at village Waghapur for the last two years. Tree cutting is a practice done from ancient times. Our college conducted a campaign against it for the last three years and aware people of this bad practice. After the campaign tree cutting reduces by about 90-95% by creating awareness against this Malpractice.




**Campaign against Palas tree cutting at village Waghapur on 05/09/2021**




**Large Branches Offer to God Hanuman on Dated 06/09/2021**




**Wastage of large branches offer to god Hanuman on dated 08/09/2021**

# वेळ प्रथा बदलण्याची, पळस वृक्ष संवर्धनाची

*लो, डाल डाल से उठी लपट! लो डाल डाल फूले पलाश।*
*यह है बसंत की आग, लगा दे आग, जिसे छू ले पलाश।।*
*लग गयी आग; बन में पलाश, नभ में पलाश, भू पर पलाश।*
*लो, चली फाग; हो गयी हवा भी रंगभरी छू कर पलाश ।।*

यामध्ये कविवर्य नरेंद्र शर्मा यांनी अगदी समर्पक वर्णन केले आहे. गावकरी मंडळी आपण पिढ्यान् पिढ्या पासून पोळा सण साजरा करतो. पोळ्याच्या दिवशी सकाळी मेढ व मुळ आणण्याची प्रथा आपल्याकडे प्रचलित आहे. एक मेढ मंदिरावर वाहतो व दुसरी मेढ घरी घेऊन येतो. ही प्रथा बहुदा आपल्या विदर्भामध्ये पहावयास मिळते. प्रत्येकी दोन मेढ असा विचार केला तर फार मोठ्या प्रमाणात पळस वृक्षाची तोड आपण करत आहोत.

**आपण पोळ्याला मेढ/डीळ का आणतो ?**

पुर्वी धान काढण्यासाठी मळणी यंत्र नव्हते, त्यावेळी बैलांच्या मदतीने पिकाची मळणी केली जायची त्यासाठी मध्यभागी मेढ रोवली जायची. ती मेढ ही पोळ्याला आनलेली पळसाची असायची. आज यांत्रिक युगामध्ये मळणीची प्रक्रिया अगदी सुलभ झाली आहे. आता त्या मेड ची गरज नाही पण प्रथा चालूच आहे. दरवर्षी पळसाची वृक्षतोड सुरूच आहे.

**आपण पोळ्याला मूळ का आणतो ?**

मेढसोबतच पळसाचे मूळ वाहण्याची पण प्रथा पोळ्याला आहे. पळसाचे मूळ धाग्यासारखे निघतात. पूर्वी झोपडी बनवताना किंवा बांधतांना या मुळीचा उपयोग होत असे. आता नायलॉन, रेशीम यासारखे पर्याय उपलब्ध झाल्यामुळे आता मुळीचा उपयोग केला जात नाही. वेळ आहे प्रथा बदलण्याची जेणेकरून आपण निसर्ग संवर्धन करण्यात आपले योगदान देऊ शकू. भारतीय संस्कृतीमध्ये प्राणी, पक्षी वृक्ष यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते. म्हणून प्रथा बंद न करता प्रथेचे स्वरूप बदलून मेढ च्या जागी त्या वृक्षाचे पूजन आपण करू शकतो.

पळसाचे शास्त्रीय नाव ब्युटिया मोनोस्पर्मा (कुल-लेग्युमिनोशी, उपकुल-पॅपिलिऑनेशी) व सामान्य नांव पळस,पलाश,धक, त्रिपत्रक, याज्ञिक, किंशुक, परुष, फ्लेम ऑफ फॉरेस्ट इत्यादी आहे. पळस वृक्ष आपल्याला जगामध्ये उष्ण व समशीतोष्ण कटिबंधिय प्रदेशात पहावयास मिळतो. इतिहासामध्ये प्लाशी चे युद्ध हे नाव त्या युद्धभूमी मध्ये जास्त प्रमाणात असलेल्या पळस वृक्षामुळेच पडले आहे. पळस हा आयुर्वेदिक औषधी गुणधर्म असलेला बहु उपयोगी वृक्ष आहे. पळसाचे फुल हे झारखंडचे राज्यफुल आहे. पळस १२-१५ मी. उंच वाढणाऱ्या ह्या मध्यम आकारमानाच्या पानझडी वृक्षाचा प्रसार भारतात फार रुक्ष प्रदेशांखेरीज सर्वत्र आढळतो. महाराष्ट्रात तो पानझडी जंगलांत सामान्यपणे दिसतो शिवाय श्रीलंका, म्यानमार, बांग्लादेश, नेपाल, पाकिस्तान, थाईलैंड, कम्बोडिया व मलेशिया येथेही आढळतो. उघड्या गवताळ रानात त्याचे शुद्ध समूह आढळतात. पळसाच्या वंशात (ब्युटिया) एकूण तीस जाती असून त्यांपैकी भारतात फक्त तीनच आढळतात.

**वृक्षवर्णन :** पळसाच्या खोडाचा घेर सु. १.५-१.८ मी. असतो, त्यावरची साल राखी, निळसर, करडी वा फिकट तपकिरी व धागेदार असून तिच्या लहानमोठ्या ढलप्या सोलून जातात. सालीवर पडलेल्या किंवा पाडलेल्या खाचांतून व भेगांतून लाल रस पाझरतो व सुकल्यावर त्याचा विशिष्ट गोंद बनतो, त्याला इंग्रजीत 'ब्युटिया गम' किंवा 'बेंगॉल कीनो' म्हणतात. पाने संयुक्त, एकाआड एक, उपपर्णयुक्त, मोठी, त्रिदली त्यावरून 'त्रिपत्रक' हे संस्कृत नांव व मराठीतील 'पळसाला पाने तीन' ही म्हण पडली आहे.थंडीत पाने गळतात आणि नवी पालवी एप्रिलमध्ये किंवा एप्रिल अखेर येते. पळसाची फुले मोठी, नारिंगी लाल व बिनवासाची असून फांद्यांच्या टोकास किंवा पानांच्या बगलेत सु. १५ सेंमी. लांब मंजरीवर फेब्रुवारी-मार्चमध्ये येतात. पर्णहीन फांद्यांवर अनेक भडकरंगी फुलोऱ्यामुळे 'वनाग्नि किंवा वन ज्योत' या अर्थाचे वर दिलेले 'फ्लेम ऑफ द फॉरेस्ट' हे इंग्रजी नाव सार्थ वाटते.

**सामान्य उपयोग :** पळसाच्या सालीच्या आतील भागापासून धागे काढतात व त्यांचा उपयोग वन्य जमाती दोराकरिता करतात, कागदनिर्मितीस व गलबतांच्या भेगा बुजविण्यास या धाग्यांचा उपयोग करतात. सुक्या फुलांपासून पिवळा रंग मिळतो. कातडी कमाविण्यास व रंगाकरिता डिंक (बेंगॉल कीनो) वापरतात. गुलाल व अबीर बनविण्यास तो उपयुक्त आहे. पळसाच्या पानांच्या पत्रावळी व द्रोण जेवणाकरिता वापरण्याची जुनी पद्धत आहे. पूर्वी धूलिवंदनाला एकमेकांच्या अंगावर टाकण्यासाठी उपयोगात येणारा रंग बनविण्यासाठी पळसाच्या फुलांचा वापर केला जात असे. आयुर्वेदिक औषधी वनस्पती म्हणूनही याचा वापर होत असे. पळसाची फुले पाण्यात टाकून स्नान केले तर त्वचारोग नाहीसा होतो, असेही आयुर्वेदात म्हटले आहे. पळसाच्या बियांचाही औषधीसाठी वापर केला जातो. अशा बहुगुणी आणि त्यांच्याकडे लक्ष जाताच पाहणाऱ्याच्या डोळ्यांना भुरळ घालणारा पळस.

यावर्षी आपण प्रथा बंद न करता पळसाचे पूजन करू व फक्त पळसाचे पान आपण मारुतीला वाहू व घरी सुद्धा नेऊ. आपले निसर्ग प्रती योगदान देऊया. वृक्ष संवर्धन म्हणजे वृक्ष लागवड.

चला तर मग संकल्प करूया, पळसाचे संवर्धन करूया.

* आपला *

**प्रा. डॉ प्रविण अजाबसिंग ठॅग**

विभागप्रमुख, वनस्पतीशास्त्र विभाग

**नेचर क्लब व वनस्पतीशास्त्र विभाग- श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मोताळा.**

**Leaflets distributed to people for awareness**




**Response against Butea tree cutting on dated 06/09/2021**

# वेळ प्रथा बदलण्याची ,पळस वृक्ष संवर्धनाची

गावकरी मंडळी आपण पिढ्यान् पिढ्या पासून पोळा सन साजरा करतो. पोळ्याच्या दिवशी सकाळी 'मेढ' आणण्याची प्रथा आपल्याकडे प्रचलित आहे. एक मेढ मंदिरावर वाहतो व दुसरी मेढ घरी घेऊन येतो. प्रत्येकी दोन मेढ असा विचार केला तर फार मोठ्या प्रमाणात पळस वृक्षाची तोड आपण करत आहोत. पळस हा आयुर्वेदिक औषधी गुणधर्म असलेला बहु उपयोगी वृक्ष आहे. पळसाचे शास्त्रीय नाव ब्युटीया मोनोस्पर्मा असे आहे. त्याला वणाची धक सुद्धा संबोधतात. पळस वृक्ष आपल्याला जगामध्ये फक्त उष्ण कटिबंधिय प्रदेशात पहावयास मिळतो. इतिहासामध्ये प्लाशी चे युद्ध हे नाव त्या युद्धभूमी मध्ये जास्त प्रमाणात असलेल्या पळस



वृक्षामुळेच पडले आहे. आपण मेढ किंवा डीळ का आणतो?पुर्वी धान काढण्यासाठी मळणी यंत्र नव्हते, त्यावेळी बैलांच्या मदतीने पिकाची मळणी केली जायची त्यासाठी मध्यभागी मेढ रोवली जायची. ती मेढ ही पोळ्याला आनलेली पळसाची असायची. आज यांत्रिक युगामध्ये मळणीची प्रक्रिया अगदी सुलभ झाली आहे. आता त्या मेड ची गरज नाही पण प्रथा चालूच आहे. दरवर्षी पळसाची वृक्षतोड सुरूच आहे. वेळ आहे प्रथा बदलण्याची जेणेकरून आपण निसर्ग संवर्धन करण्यात आपले योगदान देऊ शकू. यावर्षी आपण प्रथा बंद न करता पळसाचे पान आपण मारुतीला वाहू व घरी सुद्धा नेऊ. आपले निसर्ग प्रती योगदान देऊया. वृक्ष संवर्धन म्हणजे वृक्ष लागवड. चला तर मग संकल्प करूया, पळसाचे संवर्धन करूया.

**प्रा.डॉ.प्रविण अजाबसिंग ठेंग**
विभागप्रमुख, वनस्पतीशास्त्र,श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा.

**Newspaper cutting of creating awareness among people 18/ 08/ 2020**

संक्षिप्त
दैनिक किसान सभा
मंगळवार १८ ऑगस्ट २०२० २

## संपादकीय...

### शेतकऱ्यांची किती उपेक्षा करणार?

स्वातंत्र्य मिळाल्यापासुन गेल्या ७३ वर्षात वैभवसंपन्न विदर्भ शासनाच्या दुर्लक्षितपणामुळे अविकसीत राहला. कोळसा, वीज, मॅगनीज विदर्भात त्यामुळे देशातील भांडवलदारांनी या ठिकाणी कारखाने थाटले. शेतकऱ्याच्या जमिनी ताब्यात घेतल्या व शेतकऱ्यांना वेढबिगार केले यामध्ये शासनाच्या कर्मचाऱ्यांना त्यांनी वापरून घेतले. आजकाल तर लोकसभेत प्रश्न विचारण्यासाठी खासदार पैसे घेतात. शेतकऱ्यांच्या समस्या मांडण्यासाठी शेतकरी स्वत:चा संसार निट चालवू शकत नाही तर पैसे कुठून देणार. छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्याचे संपूर्ण कर्ज माफ करून शेतीसाठी आवश्यक ती मदत केली होती. पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कर्जलवाद बील मंजूर करून संपूर्ण कर्ज माफ केले होते. १९३२ ला त्यांनी मध्यप्रांत कायदे मंडळात हिंदू देवस्थान संपत्ती बिल मांडले होते परंतू उच्चवर्णियांनी ते मंजूर होवु दिले नाही. आपला एक निस्पृह व अभ्यासु व मानवतावादी आव्हान तेव्हा मंदीर, मस्जिद, चर्च यासारखी मस्तवाल धर्ममार्तंडाची कुरण ताब्यात घेवून त्याठिकाणी शैक्षणिक संकूल तयार करावे धर्माच्या नावावर सामान्य नागरिकामध्ये भेदाभेद निर्माण करणाऱ्या ह्या मस्तवाल धर्ममार्तंडांचे शक्तिस्थाने नष्ट करावीत व मानवता निर्माण करण्यसाठी त्याठिकाणी उत्तम दर्जाच्या शैक्षणिक संस्था निर्माण कराव्यात. गेल्या साठ वर्षापासुन विदर्भाचा शेतकरी दिवसेंदिवस खंगत चालला आहे. ठिबक, तुषार, खत यासारख्या योजनासाठी अनुदान दिल्या जाते ते अनुदान मुजोर कर्मचाऱ्यांच्या मदतीने खाजगी कंपन्यावालेच फस्त करतात. आजपर्यंत शेतकऱ्यासाठी दिला गेलेला पैसा शेतकऱ्यापर्यंत पोचलाच नाही. भांडवलदारानीच

### वेळ प्रथा बदलण्याची, पळस वृक्ष संवर्धनाची



गावकरी मंडळी आपण पिढ्यान् पिढ्या पासून पोळा सन साजरा करतो. पोळ्याच्या दिवशी सकाळी मेढ आणण्याची प्रथा आपल्याकडे प्रचलित आहे. एक मेढ मंदिरावर वाहतो व दुसरी मेढ घरी घेऊन येतो. प्रत्येकी दोन मेढ असा विचार केला तर फार मोठ्या प्रमाणात पळस वृक्षाची तोड आपण करत आहोत. पळस हा आयुर्वेदिक औषधी गुणधर्म असलेला बहु उपयोगी वृक्ष आहे. पळसाचे शास्त्रीय नाव ब्युटीया मोनोस्पर्मा असे आहे. त्याला वणाची धक सुद्धा संबोधतात. पळस वृक्ष आपल्याला जगामध्ये फक्त उष्ण कटिबंधिय प्रदेशात पहावयास मिळतो. इतिहासामध्ये प्लाशी चे युद्ध हे नाव त्या युद्धभूमी मध्ये जास्त प्रमाणात असलेल्या पळस वृक्षामुळेच पडले आहे.

आपण मेढ किंवा डीळ का आणतो?

पुर्वी धान काढण्यासाठी मळणी यंत्र नव्हते, त्यावेळी बैलांच्या मदतीने पिकाची मळणी केली जायची त्यासाठी मध्यभागी मेढ रोवली जायची. ती मेढ ही पोळ्याला आनलेली पळसाची असायची. आज यांत्रिक युगामध्ये मळणीची प्रक्रिया अगदी सुलभ झाली आहे. आता त्या मेड ची गरज नाही पण प्रथा चालूच आहे. दरवर्षी पळसाची वृक्षतोड सुरूच आहे. वेळ आहे प्रथा बदलण्याची जेणेकरून आपण निसर्ग संवर्धन करण्यात आपले योगदान देऊ शकू. यावर्षी आपण प्रथा बंद न करता पळसाचे पान आपण मारुतीला वाहू व घरी सुद्धा नेऊ. आपले निसर्ग प्रती योगदान देऊया. वृक्ष संवर्धन म्हणजे वृक्ष लागवड. चला तर मग संकल्प करूया, पळसाचे संवर्धन करूया.

आपला,

**प्रा. डॉ प्रविण अजाबसिंग ठेंग**
विभागप्रमुख, वनस्पतीशास्त्र,
**श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा.**

..पान नं.१वरुन **कोरोना अलर्ट : प्राप्त ८४ कोरोना...**

..पान नं.१वरुन **महाराष्ट्र नवनिर्माण कामगार...**

पदाधिकारी, गणेश बरबडे यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त केले व जिल्हातील सर्व मनसे चे कार्यकर्ते हे कामगार यांच्या न्याय हक्कासाठी त्यांचे सोबत असुन त्यांचे करीता त्यांच्या लढ्यामध्ये पूर्णपणे सहभागी असुन त्यांचे सोबत असल्याची ग्वाही त्यांनी दिली या सोबतच जिल्हा अध्यक्ष अकोला रामा भाऊ उंबरकर यांनी सुध्दा आपले विचार व्यक्त केले या प्रसंगी मा.उपजिल्हाध्यक्ष,राजेश परिहार मा.उपजिल्हाध्यक्ष,आदित्य दामले उपाध्यक्ष मनविसे अकोला,प्रदीप

**Newspaper cutting of creating awareness among peoples on date 18/08/2020**

## Tree Plantation Program at Kharbadi:

A tree plantation program was organized at NSS adopted village of Kharbadi on 25 March 2023. The department of NSS conducted this tree plantation drive during "Shramsanskar Shibir".




**Tree plantation drive at NSS adopted village Kharbadi on dated 25/03/022**




**Tree plantation drive at NSS adopted village Kharbadi on dated 25/03/02**

## Tree plantation drive at Didola Bk:

A tree plantation drive was organized at the adopted village of Didola. Department of Botany in collaboration with the Department of NSS and IQAC conducted this tree plantation drive. The plants grown in the nursery of the college were used for this drive. About 500 plants were planted at Didola Bk.




**Dr. Sarika Bhagat (Executive Magistrate, Motala) planted Tree on dated 20/09/2022**



**Tree Plantation Drive at Adopted Village Didola BK on dated 20/09/2022**



देशोन्नती

# दत्तक ग्राम डिडोळा येथे वृक्षारोपण

देशोन्नती वृत्तसंकलन...

**बुलढाणा** ■ श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा यांच्या वतीने दत्तक ग्राम डिडोळा येथे २० सप्टेंबर रोजी वृक्षारोपण कार्यक्रम वनस्पतीशास्त्र विभाग, पर्यावरण संवर्धन समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सरस्वती विद्यालय डिडोळा येथे आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला प्राचार्य डॉ.गजानन जाधव, तहसिलदार डॉ.सारिखा भगत, वनपाल प्रशांत राजपूत, वनरक्षक एस. बी.खुळे व विठ्ठल दिघे हे उपस्थित होते. ३०० वृक्षरोपांचे वृक्षारोपण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.वृक्षारोपणसाठी आणलेले झाडे महाविद्यालयातील रोपवाटिकेत विद्यार्थी सहभागातून तयार करण्यात आली आहे. वृक्षारोपणामध्ये प्रामुख्याने देशी प्रजातीच्या चिंच, बेहडा, अमलताश व रिठा सारख्या झाडाची लागवड करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत सरस्वती विद्यालयाच्या लेझिम व ढोल ताशा पथकाने केले. वृक्षारोपण नंतर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन सभा घेण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ गजानन जाधव, डॉ.सारिखा भगत, पाटणे, प्रशांत राजपूत, एस.बी.खुळे, दिगंबर पाटील, सतीश सिराळ व विठ्ठल दिघे मंचावर उपस्थित होते. यावेळी प्रमुख अतिथी डॉ.सारिखा भगत व डॉ. गजानन जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन वनस्पती शास्त्र विभागप्रमुख डॉ.प्रविण ठेंग व आभार राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक प्रा.दादा मनगटे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. निलेश रहाटे, प्रा.नागेश गड्डवार, प्रा. डॉ.अभय ठाकूर, प्रा.डॉ.अरुण गवारे, प्रा.शुभम साखरे, प्रा.दादा मनगटे व डॉ. चित्रा मोरे यांनी प्रयत्न केले. यावेळी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. (का.प्र.)

Deshonnati Edition
Sep 24, 2022 Page No. 5
Powered by : eReleGo.com

**Newspaper Cutting: Tree Plantation at Didola Bk.**




**Students Eradicating weeds near plants at adopted village Didola BK on 20/11/2022**

## Appreciation Letter From Grampanchayat Didola Bk.

# ग्रामपंचायत कार्यालय - डिडोळा बु।।

**पंचायत समिती मोताळा जि.बुलडाणा**


श्री.संतोष काशिराम भोपळे
सरपंच
मो.नं.9922178851

श्री.अर्जुन मधुकर वाघ
उपसरपंच
मो.नं.9785129680

श्री.दिलीप लांजुळकर
सचिव
मो.नं.9423447043


जा.क्र.

दिनांक :23/ 09 /२022

## Appreciation Letter

Respected Principal, Shri Shivaji Arts, Commerce and Science College, Motala, our Department of Botany in collaboration with the Department of National Service Scheme organize tree plantation at Didola Bk on Tuesday, 20/09/2022. Our teacher and students actively participated in planting 500 indigenous trees and contribute to tree plantation.

We are thankful for our college work in the contribution to environmental conservation!

सरपंच
ग्राम पंचायत डिडोळा बु.

## Tree Plantation For Miyawaki Forest Sindkhed (Praja) and Jaipur:

Our Shri Shivaji Arts, Commerce, and Science College Motala is conscious of the environment. Paani Foundation takes the initiative to develop the Miyawaki forest at Sindkhed (Praja) and Jaipur. All the students and staff of the college contributed to the tree plantation in Miyawaki Forest. Within five hours students planted about 9,000 plants.




**Tree plantation program for Miyawaki Forest at Sindkhed (Praja) on 16 November 2022**




**Students Participated in Tree Plantation on 16 November 2022**



**Students distributed plants by making chains and planting trees on 16 November 2022**




**Tree plantation program for Miyawaki Forest at Jaipur (Motala) on 22 Nov. 2022**




**Tree plantation program for Miyawaki Forest at Jaipur (Motala) on 22 Nov. 2022**




**NSS Volunteers Participate in Tree Plantation at Jaipur on 22 Nov. 2022**




**Leaflet of Miyawaki Forest "Mhashramadan"**




**Tree plantation program for Miyawaki Forest at Sindkhed (Praja) on 16 Nov. 2022**












**देशोन्नती**

# सिंदखेड येथे वृक्ष लागवडीचा विश्वविक्रम ५ तासात तब्बल १० हजार वृक्ष लागवड

**तळणी** ■ तालुक्यातील सिंदखेड येथे मियावाकी वृक्ष लागवड अंतर्गत १० हजार वृक्षलागवड करण्यात आले. ही वृक्षलागवड तब्बल २ एकरावर ५ तासात पूर्ण करण्याचा विक्रम या गावाने केला. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी एच.पी. तुंम्मोड, गट विकास अधिकारी मोहोड, तहसीलदार सारिका भगत, शिवाजी कॉलेजचे प्राचार्य जाधव, वनपरीक्षेत्र अधिकारी वनविभाग श्रीमती नेहा मुरकुटे व सामजिक वणिकरचे थोरात, मंडळ कृषी अधिकारी कंकाळ, पाणी

**मियावाकी प्रकल्प जिल्हासाठी गौरवाची बाब- जिल्हाधिकारी**
सिंदखेड येथे झालेला मियावाकी प्रकल्प बुलढाणा जिल्ह्यासाठी एक गौरवाची आणि अभिमानाची बाब आहे असे प्रतिपादन जिल्हाधिकारी यांनी आपल्या प्रबोधनांमध्ये केली. यावेळी उपस्थित शालेय विद्यार्थ्यांना त्यांनी या झाडांचे पालकत्व स्वीकारण्याची आवाहनही केले.

फाऊंडेशनचे सुखदेव भोसले, ब्रम्हदेव गिन्हे, निलेश बढे व कृषी सहायक संघटना, ग्रामसेवक संघटना शालेय विद्यार्थी उपस्थित होते. पानी फाऊंडेशन व सेट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने मोताळा तालुक्यातील सिंदखेड व जयपूर या गावांची मियावकी जंगलासाठी निवड करण्यात आली आहे. यातील सिंदखेड येथे आज वृक्षारोपण करण्यात आली. तीन दिवसाचे लागवडीचे नियोजन असताना योग्य नियोजन व उत्साही श्रमकरी यांच्यामुळे फक्त ५ तासात १० हजार वृक्ष लागवड करून नवा विक्रम गावाने रचला आहे. या जंगलामुळे परिसरातील २० किमी परिसरातील निसर्ग समृद्ध होण्यासाठी मोठी मदत होणार आहे, यामुळे तालुक्याच्या वैभवात मोठी भर पडणार आहे अशी माहिती सेट्रीजचे चैतन्य जोशी यांनी दिली. या श्रमदानामध्ये सहकार विद्या मंदिर, एम.इ.एस. हायस्कूल, छत्रपती शिवाजी कॉलेज मोताळा यांचे विद्यार्थी व शिक्षकवृंद आदी उपस्थित होते. (वार्ताहर)

Deshonnati Edition
Nov 17, 2022 Page No. 1
Powered by : eReleGo.com



**देशोन्नती**

# जयपूर श्रमदानात शिवाजी महाविद्यालयाचा उत्स्फूर्त सहभाग

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मोताळा** ■ स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मोताळा येथील प्राचार्य डॉ.गजानन जाधव यांच्या मार्गदर्शनात राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना विभागातील विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आज मंगळवार २२ नोव्हेंबर रोजी जयपुर ता. मोताळा येथे मियावाकी जंगल निर्मितीत सहभाग घेतला.


सिंदखेड पाठोपाठ जयपूर गावात असलेल्या अडीच एकर जमिनीत दहा हजार झाडे लावण्याचा उपक्रम गावकऱ्यांनी घेतला आहे. त्यासाठी २२ नोव्हेंबर रोजी महाश्रमदानाचे आयोजन करण्यात आले होते. गावातील सरपंच, उपसरपंच, पाणी फाऊंडेशनचे विभागीय समन्वयक, तालुका समन्वयक यांनी तालुक्यातील विविध संस्था, महाविद्यालय यांना या अभियानांतर्गत श्रमदानात सहभागी होण्याचे आवाहन केले होते. या अभियानाला प्रतिसाद देत श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील प्राचार्य, प्राध्यापक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी जयपूर गावी आपली उपस्थिती दिली. श्रमदानातून मियावाकी पद्धतीने दहा हजार झाडे लावण्याचा उद्देश आहे, वृक्षांची मियावकी पद्धत म्हणजे लहान खड्डामध्ये अनेक प्रकारचे वृक्ष एकसारखे असतात. लहान क्षेत्रामध्ये एकत्र असणारी अनेक झाडे जवळजवळ लावून हिरव्या झाडास समृद्ध करतात आणि जमिनीची समृद्धी वाढवतात. मियावाकी पद्धतीत समाजाचा सहभाग घेऊन वृक्षारोपण केले जाते. रोपे लावल्यानंतर दहा वर्षाच्या कालावधीत दाट जंगल तयार होण्यास सुरुवात होते. यापूर्वी १६ नोव्हेंबर रोजी पाच तासात तब्बल १० हजार झाडे लावण्याचा विश्वविक्रम सिंदखेड प्रजा या गावात करण्यात आला, त्यावेळी सुद्धा श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांनी त्या महाश्रमदानात उत्स्फूर्त सहभाग घेतला होता.

जयपूर येथील मियावकी जंगल निर्मिती महाश्रमदानचे उद्घाटन बुलडाणा जिल्ह्याचे अप्पर जिल्हाधिकारी धनंजय घोंगटे यांनी केले. यावेळी प्रमुख उपस्थितीत मोताळा तहसीलदार भगत, वनपरिक्षेत्र अधिकारी थोरात, विभागीय वन अधिकारी पायघन, उपमुख्य कार्यकारी अधिकारी लोखंडे, जयपूर गावाच्या सरपंच देशमुख उपस्थित होते. या अभियानात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गजानन जाधव,उपप्राचार्य डॉ. सुनिल मामलकर, प्रा.अविनाश मेहेरकर, प्रा.दादा मनगटे, प्रा. डॉ अभय ठाकूर, प्रा.डॉ.प्रविण ठेंग, प्रा.दिनेश ढगे, प्रा.सौ नंदा मास्कर, प्रा.डॉ.चित्रा मोरे, प्रा.भास्कर भिसे, प्रा. नागेश गड्डवार, प्रा.साखरे, प्रा.चाटे, प्रा.सुप्रिया बेहेरे, प्रा. गायकी, प्रा.चन्नेकर, प्रा. रहाटे, प्रा. ब्राम्हणकर, प्रा.डॉ.गवारे, प्रा. अमृतकर, दाभाडे तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. (ता.प्र.)

Deshonnati Edition
Nov 23, 2022 Page No. 3
Powered by : eReleGo.com

**Miyawaki at the time of cultivation**






लोकमत

# ओसाड माळरानावर साकारतंय घनदाट जंगल!

## सिंदखेड येथे मीयावाकी प्रकल्पाची सकारात्मक वाटचाल

नवीन मोदे
लोकमत न्यूज नेटवर्क

**धामणगाव बढे :** मोताळा तालुक्यातील सिंदखेड येथील ओसाड माळरानावर मीयावाकी संकल्पनेनुसार विदर्भातील सर्वात मोठ्या घनदाट जंगल निर्मितीस नोव्हेंबर २०२२ मध्ये प्रारंभ झाला होता. सुमारे सहा महिन्यानंतर या प्रकल्पाचे सकारात्मक परिणाम समोर आले असून सिंदखेड येथील ओसाड असलेल्या सुमारे एक हेक्टर क्षेत्रात विविध प्रकारची हिरवीगार झाडे डोलत आहेत.

विविध पक्ष्यांना आपले घरटे या जंगलामध्ये मिळाले असून पक्षांचा किलबिलाट येथे सदैव सुरू असतो, पुढील दोन वर्षांत या ठिकाणी २० ते २५ फूट उंचीचे घनदाट जंगल निर्माण होणार आहे. सिंदखेड ग्रामस्थ, पाणी फाउंडेशन व सेट ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रकल्पाची संकल्पना साकारण्यात येत आहे.

अतिशय तापमान वाढलेले असतानासुद्धा भर उन्हाळ्यामध्ये सिंदखेड ग्रामपंचायत तसेच गावकऱ्यांतर्फे या प्रकल्पाचे संरक्षण केले जात आहे. ठिबक सिंचनद्वारे या जंगलातील झाडांना पाणी पुरवले जात आहे. मोताळा तालुक्यामध्ये तसेच धामणगाव बढे परिसरात मोठ्या प्रमाणात सर्रास वृक्षतोड सुरू असताना सिंदखेड येथे उभारला जाणारा प्रकल्प दिशादर्शक ठरणार आहे.

ओसाड जमिनीवर फुलझाडेही बहरली आहेत.

### पर्यावरण क्षेत्रातदेखील सिंदखेड अव्वल

- महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे राबवलेल्या माझी वसुंधरा २.० या राज्यव्यापी अभियानात सिंदखेड अमरावती विभागात अव्वल ठरली आहे. तसेच ३.० चा निकाल ५ जून रोजी पर्यावरण दिनी लागणार आहे. त्यामध्येसुद्धा सिंदखेड राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करेल, असा आशावाद सरपंच प्रवीण कदम यांनी व्यक्त केला आहे.

### जंगल निर्मितीचा फायदा १५ किमी परिघात होणार

या प्रकल्पातून होणाऱ्या जंगल निर्मितीचा फायदा सुमारे १५ किलोमीटर परिघात होणार आहे. या प्रकल्पांतर्गत विविध ५५ प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली आहे. त्यामध्ये औषधी गुणधर्म असलेले दुर्मीळ वृक्षाचे संगोपन केले जात आहे. जंगलामध्ये पशुपक्ष्यांना व मधमाश्यांना हक्काचे घर मिळेल. सोबतच शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी, रोगावर नियंत्रण मिळवण्यासाठी, परागीभवन होण्यासाठी मोठ्या प्रमाणात मदत होईल. शाश्वत विकासाच्या दृष्टीने सिंदखेडची वाटचाल होण्यास हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे.

Hello Buldhana
Page No. 3 May 24, 2023
Powered by: erelego.com



लोकमत

आय विटनेस ओसाड माळरानावर साकारतंय घनदाट जंगल...

धामणगाव बढे : सिंदखेड येथे मीयावाकी प्रकल्प साकारत आहे. या प्रकल्पांतर्गत ओसाड असलेल्या एक हेक्टरवर विविध प्रकारची वृक्ष सध्या बहरले आहे. ग्रामस्थ या वृक्षांची काळजी घेत असल्याने दोन वर्षातच ओसाड जमिनीवर जंगलाची निर्मिती होत आहे.

Akola Main
Page No. 2 May 24, 2023
Powered by: erelego.com

**Miyawaki Forest Six Month of Cultivation (After)**

## PAANI Foundation:

Paani Foundation is a nonprofit, nongovernment organization that is active in the area of drought prevention and watershed management in the state of Maharashtra, India. The organization was founded by Actor Amir Khan and his wife Kiran Rao. Our college contributes to the construction of Miyawaki Forest at Sindkhed (Praja) and Jaipur (Kothali) Tahsil Motala. For this work, Paani Foundation appreciates it and issues an appreciation letter.

Paani FOUNDATION

**Letter of Appreciation**

Respected Principal, Shri Shivaji Arts, Commerce and Science College Motala we Paani Foundation, sayTrees Bangalore in collaboration organize a tree plantation for Miyawaki Forest Mahashrashtra on the date 16 November 2022 at Sidhkhed (Praja) and at Jaipur on the date 23 November 2022. Our all Teachers and Students actively participated in planting 9000 trees in both villages and contribute to tree plantation.

We are thankful for our college work in the contribution to environmental conservation.

Date: 23 Nov. 2022

Taluka Coordinator
Paani Foundation
Motala, Dist. Buldhana

Office- Paani Foundation, Lower Floor, Kuber Niwas, Banglow no, 283/C/2 Saraswat Colony, Meera Bagh Road, Santakruz- West, Mumbai- 400054 Email: paanifoundetion@paanifoundetion.in
Telephone: +919920388749 Fax: +911123723909

**Appreciation Letter from Paani Foundation**

## Tree Plantation and Seedball Preparation:

Tree plantation was organized by the Department of NSS and NCC on the occasion of World Environment Day on dated 5 June 2020. Due to the Corona Pandemic students planted trees at his home.

An online seed ball preparation workshop was organized by the Biological Society. Students prepare seed balls and throw nearby areas. Mr. Shubham Jaiswal prepares the highest 501 seed ball.

## Photographs:



**Students Planted trees at home and in the nearby area on 5 June 2020**

## Newspaper Cuttings:



### श्री शिवाजी महाविद्यालयात 'सीड बॉल निर्मिती कार्यशाळा' संपन्न

**मोताळा:** स्थानिक श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'बायोलॉजिकल सोसायटी आणि ग्रीन आर्मी' यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाईन सीड बॉल निर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ मामलकर सर यांच्या मार्गदर्शनात सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाची आवड निर्माण करणे हा या आयोजनामागील उद्देश होता. सीड बॉल ची संकल्पना प्राणीशास्त्र विभागप्रमुख प्रा डॉ अभय ठाकूर सरांनी विशद केली. वृक्षबीज फेकण्यापेक्षा सीड बॉल बनवून फेकने किती महत्वाचे आहे ते वनस्पतीसशास्त्र विभाग प्रमुख प्रा डॉ प्रविण ठेंग सरांनी सांगितले. कार्यशाळेचे संयोजक प्रा साखरे सर हे होते. कार्यशाळेला विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते, त्यामधील शुभम जैस्वाल या विद्यार्थ्याने सर्वाधिक ५०१ सीड बॉल बनवून प्रथम क्रमांक पटकावला. कार्यशाळेच्या शेवटी प्रश्नमंजुषा चे आयोजन करण्यात आले होते. सहभागी सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. कोविड १९ विषाणूचा प्रादुर्भाव लक्षात घेता कार्यशाळा ही ऑनलाईन पद्धतीने गूगल मीट, गूगल क्लास रूम व व्हॉटसअप सारख्या माध्यमाच्या मदतीने पूर्ण करण्यात आले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ गवारे, डॉ मोरे व डॉ उके यांनी परिश्रम घेतले.

दरवर्षी पर्यावरणाचा समतोल व संतुलन टिकून ठेवण्यासाठी वृक्ष लागवड ही प्रत्येक काळाची गरज आहे व वृक्ष ही मानवासाठी निसर्गाने दिलेलं एक अनमोल वरदान आहे म्हणून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना या विभागाच्या वतीने वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात येते. परंतु यावर्षी जागतिक कोरोणाच्या महामारी मुळे गेल्या मार्च महिन्यापासून महाविद्यालयातील विद्यार्थी अनुपस्थित आहेत. परंतु सामाजिक अंतर राखण्याच्या दृष्टिकोनातून महाविद्यलयीन विद्यार्थ्यांना आपल्याच घरी राहून, आपल्याच गावामध्ये वृक्षारोपण करण्याकरीता आवाहन करण्यात आले. या आवाहनानुसार महाविद्यलयातील राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण पार पाडले व त्याच्या संगोपनाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली.



### श्री शिवाजी कला वाणिज्य व व विज्ञान महाविद्यालयाच्या ३० विद्यार्थ्यांनी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपापल्या दारी केले वृक्षारोपण

**मोताळा:** स्थानिक श्री शिवाजी कला वाणिज्य व व विज्ञान महाविद्यालयात दिनांक ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिना निमित्त वनस्पतिशास्त्र आणि प्राणीशास्त्र विभागातर्फे आयोजित कार्यक्रमांतर्गत महाविद्यालयातील विज्ञान विभागातील विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी तीस विद्यार्थ्यांनी झाडे लावून जागतिक पर्यावरण दिवस साजरा केला. जगातील १०० पेक्षा जास्त देशांमध्ये दिनांक ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिवस म्हणून उत्साहात साजरा केल्या जातो. या दिवसाचा मुख्य उद्देश म्हणजे जगातील प्रत्येक माणसांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती करणे आणि संपूर्ण राष्ट्राने पर्यावरणाविषयी पुधकार घेणे असा आहे. जागतिक पर्यावरण दिवस हा जगात वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात येतो. पर्यावरणाविषयी जनजागृती करण्यासाठी आज सभा, संमेलने, आणि चर्चासत्रे आयोजित करणे हे महत्त्वाचे आहे. विद्यार्थी दशेत पर्यावरणाविषयी जनजागृती ही अत्यंत महत्त्वाची आहे. याच संकल्पनेचा हेतू लक्षात घेऊन श्री शिवाजी महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्र विभागातर्फे विद्यार्थ्यांमध्ये झाडे आणि प्राण्यांविषयी माहिती गूगल क्लासरूम आणि इंटरनेट माध्यमातून देण्यात आली. संकल्पने साठी स्थानिक महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. मामलकर सर आणि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रवीण ठेंग तसेच प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ.अभय ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले तसेच दोन्ही विभागातील प्राध्यापक प्रा साखरे सर, डॉ उके सर, डॉ गवारे सर आणि डॉ मोरे मॅडम यांची सहकार्य लाभले.

## Tree Plantation at Sangalad:

Tree plantation was conducted by the Department of NSS at Sangalad during "Shram Sanskar Shibir" on dated 27 February 2023. Tree plantation taken by Dr. Parmanand Ingle and a team of Rural Hospital Motala.












**Tree Plantation Plantation at Sanglad on 27 February 2023**

## Cleaning of River at Sangalad:

Cleaning of the river was conducted by the Department of NSS at Sangalad during “Vishash Shramsanskar Shibir” at Sangalad on dated 1 March 2023. Students collected plastic and waste material from the river and contribute to the conservation of the river.




**Cleaning of the river at Sangalad on 01 March 2023**

IQAC CO-ORDINATOR
Shri Shivaji Arts,Commerce
and Science College,Motala

Shri Shivaji Arts, Comm. & Science College * Motala *

Principal
Shri Shivaji Arts,Commerce
& Science College,
Motala.Dist-Buldana